**महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अन्वये स्थापना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: नपुप्रा-२०२५/प्र.क्र.३२/तां.क.३**
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०८ ऑक्टोबर, २०२६

वाचा:- या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि.२७.०४.२०२६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदूषण कमी करणे तसेच नदी संवर्धन व पुनरुज्जीवनाची कामे प्रभावीपणे राबविण्यासाठी नियामक व विकासात्मक कार्ये एकत्रित करण्याच्या उद्देशाने पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या दि.२७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. सदर प्राधिकरणाच्या स्थापनेसाठी वित्त व नियोजन विभागासह संबंधित विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

प्राधिकरणाच्या कार्यासाठी प्रस्तावित निधी संरचनेमध्ये संमिश्र वित्तपुरवठा (Blended Finance) समाविष्ट करण्यात आला आहे. विविध वित्तीय स्रोतांमधून संसाधने एकत्रित करून त्यांचा नदी संवर्धन व पुनरुज्जीवनाच्या कामांसाठी प्रभावीपणे वापर करणे, तसेच CSR, देणग्या, अनुदाने व इतर अनुमत स्रोतांमधून निधी उपलब्ध करून घेणे यासाठी सक्षम संस्थात्मक व्यवस्था आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची कार्यवाही कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ (Section ८) अन्वये ना-नफा तत्त्वावर कार्य करणाऱ्या कंपनीच्या माध्यमातून पुढे नेण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर कंपनीचे नाव “Maharashtra State River Rejuvenation Council” असे असून, या नावास भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाकडून दि. ३१.०७.२०२६ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्रस्तावित कलम ८ (Section ८) खालील कंपनीच्या स्थापनेसाठी शासनाची स्वतंत्र व स्पष्ट मान्यता आवश्यक असल्याचे विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायातून निदर्शनास आले आहे. त्यामुळे, दि.२७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली प्राधिकरणाची उद्दिष्टे,

कार्यक्षेत्र, त्रिस्तरीय रचना व निधी संरचना अबाधित ठेवून, प्राधिकरणाची कार्यवाही कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अन्वये कंपनीच्या माध्यमातून राबविण्याच्या अनुषंगाने प्रस्तावित आहे.

**शासन निर्णय:-**

१. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या दि. २७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची कार्यवाही कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ (Section ८) अन्वये ना-नफा तत्त्वावर कार्य करणाऱ्या कंपनीच्या माध्यमातून राबविण्याबाबत शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर कंपनीचे नाव "Maharashtra State River Rejuvenation Council" असे राहील. कंपनीची स्थापना व नोंदणी कंपनी कायदा, २०१३ व त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांनुसार करण्यात येईल.

३. दि.२७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली प्राधिकरणाची उद्दिष्टे, कार्यक्षेत्र व त्रिस्तरीय रचना कायम राहील. मात्र सदर रचना आता कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ च्या तरतुदींशी सुसंगत पद्धतीने कंपनीच्या संस्थात्मक व प्रशासकीय रचनेत समाविष्ट करण्यात येईल.

४. प्राधिकरणासाठी दि. २७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली संमिश्र वित्तपुरवठा (Blended Finance) आधारित निधी संरचना कायम राहील. या शासन निर्णयाद्वारे सदर निधी संरचनेमध्ये कोणताही मूलभूत बदल करण्यात येत नाही.

५. कंपनीमार्फत CSR निधी, देणग्या, अनुदाने व इतर अनुमत वित्तीय स्रोतांमधून निधी प्राप्त करून त्याचा नदी संवर्धन, पुनरुज्जीवन व संबंधित सार्वजनिक हिताच्या कामांसाठी वापर करण्यात येईल. सदर कार्यवाही प्रचलित कायदे, नियम व शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन राहील.

६. दि.२७.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाच्या स्थापनेसाठी प्राप्त झालेली मा. मंत्रिमंडळाची मान्यता अबाधित राहील. या शासन निर्णयाद्वारे प्राधिकरणाच्या मूलभूत उद्दिष्टे, कार्यक्षेत्र, त्रिस्तरीय रचना किंवा निधी संरचनेत कोणताही धोरणात्मक बदल करण्यात येत नाही.

७. केवळ महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची कार्यवाही कंपनी कायदा, २०१३ मधील कलम ८ अन्वये कंपनीच्या माध्यमातून राबविण्यासाठी आवश्यक असलेली शासनाची मान्यता या शासन निर्णयाद्वारे देण्यात येत आहे.

८. सदर कंपनीची स्थापना व नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेली MoA, AoA व इतर वैधानिक कागदपत्रे अंतिम करून, कंपनी कायदा, २०१३ नुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास प्राधिकृत करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००८१५२४०८२६०४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

RAMESH MURARI MANALE

Digitally signed by RAMESH MURARI MANALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Environment Department,
2.5.4.20=3AFDFF0BF288C02A1A4C514992D6AB6F28B31FCBD83BCCF465EC868151EE5BBD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=2A544F07211AC905895E246B961BC9981C480A91372BB58AE26124A46F104C47, cn=RAMESH MURARI MANALE
Date: 2026.10.08 15:25:18 +05'30'

**(रमेश मु. मनाळे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, राज भवन, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल,मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री, खनिकर्म (उद्योग) विभाग,मंत्रालय, मुंबई.
७. मा. मंत्री, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मंत्रालय, मुंबई.
१२.अ.मु.स./प्र.स./सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.अ.मु.स./प्र.स./सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.अ.मु.स./प्र.स./सचिव, खनिकर्म (उद्योग) विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.अ.मु.स./प्र.स./सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६.अ.मु.स./प्र.स./सचिव, वने, मंत्रालय, मुंबई.
१७.सह सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मंत्रालय, मुंबई.
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, MITRA
१९.संचालक, नीरी, नागपूर.
२०.महालेखापाल (लेखापरिक्षा) १. महाराष्ट्र मुंबई-४०००२०.
२१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई- ४०००२०.
२२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
२३.महालेखापाल (लेखापरिक्षा) २. महाराष्ट्र, नागपूर.
२४.अधिदान व लेखाधिकारी, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०००५१.
२५.निवडनस्ती (कार्यासन तां.क.३).